



दैनिक अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : २०९, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, गुरुवार, दि.१२ मार्च २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## इंधन संकट एका झटक्यात संपलं, पुन्हा सुरळीत होणार गॅसचा पुरवठा ?

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.११, दिल्ली :** अमेरिका, इस्त्रायल आणि इराणमध्ये युद्ध सुरू आहे. या युद्धाचा मोठा परिणाम हा इंधन पुरवठ्यावर झाला आहे. जगातील अनेक देशांना या युद्धामुळे इंधन टंचाईची झळ बसली आहे. भारताला देखील मोठा फटका बसला आहे. मध्य पूर्वेत सध्या मोठा तणाव निर्माण झाला आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर इराणने काही देशांसाठी विशेषः अमेरिका आणि अमेरिकेचे सहकारी देश आणि युरोपीयन देशांसाठी होर्मुजची सामुद्रधुनी बंद केली आहे. तर इतर देशांमधील तेल कंपन्यांनी हल्ला होण्याची भीती असल्यामुळे या मार्गाने तेल वाहतूक करण्यास नकार दिला आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात इंधन टंचाई जाणवत आहे. दरम्यान भारतामध्ये देखील गॅसचा प्रचंड प्रमाणात तुटवडा निर्माण झाला आहे. अनेक ठिकाणी गॅस नसल्यामुळे हॉटेल बंद



ठेवण्याची वेळ हॉटेल व्यावसायिकांवर आली आहे. मात्र आता एक मोठी आनंदाची बातमी समोर येत आहे, ती म्हणजे भारताचं इंधन संकट दूर होणार आहे. याबाबत सरकारकडून महत्त्वाची माहिती देण्यात आली आहे.

एका सरकारी अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार नॅचलर गॅसचे दोन मोठे कार्गो लवकरच भारतामध्ये येत आहेत. पेट्रोलियम आणि मनुष्यबळ विकास मंत्रालयाचे संयुक्त सचिव सुजाता शर्मा यांनी याबाबत माहिती दिली आहे. नॅचरल गॅसचे दोन मोठे कार्गो लवकरच भारतामध्ये पोहोचत आहे, कच्च्या तेलाचा पुरवठा देखील सुरळीत आहे, असं यावेळी सुजाता शर्मा यांनी म्हटलं आहे. पुढे बोतलाना त्या म्हणाल्या की, ओएमसीकडून वेगवेगळ्या देशांमधून कच्चे तेल खरेदी केलं जात आहे. पूर्वी होर्मुझच्या सामुद्रधुनीमधून भारतामध्ये ४५ टक्के कच्च तेल यायचं तर इतर मार्गाने ५५ टक्के कच्चे तेल यायचं. दरम्यान आता यामध्ये मोठा बदल करण्यात आला आहे. आता सध्याच्या परिस्थितीमध्ये भारतात येणारं सुमारे ७५ टक्के कच्चं तेल हे इतर मार्गाने येत आहे. तर होर्मुझ मार्गे केवळ २५ टक्केच कच्चे तेल भारातमध्ये येत आहे.

दरम्यान ग्राहकांनी गॅस सिलिंडच्या बुकिंगसाठी घाई करू नये, त्यामुळे गोंधळाचं वातावरण निर्माण होत आहे. गॅसचा तुटवडा होणार नाही याकडे सरकारचं लक्ष आहे. तसेच गॅस वितरणावर देखील विशेष लक्ष ठेवलं जात आहे. या जागतिक संकटाच्या काळात इंधन टंचाई निर्माण होऊ नये, यासाठी सरकारचे प्रयत्न सुरू आहेत, असंही यावेळी शर्मा यांनी म्हटलं आहे.

## जिष्णू देव वर्मा यांनी घेतली राज्यपालपदाची शपथ



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.११, मुंबई :** महाराष्ट्राचे नवनियुक्त राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी राज्यपाल पदाची शपथ घेतली. लोकभवनातील दरबार सभागृह येथे झालेल्या शपथविधी सोहळ्यात मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर यांनी त्यांना राज्यपालपदाची शपथ दिली.

शपथविधीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. जिष्णू देव वर्मा हे महाराष्ट्राचे २२ वे राज्यपाल आहेत.

## ठाण्यात नगरसेवकाची पालिका मुख्यालयातच आंघोळ

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.११, ठाणे :** ठाणे महापालिका क्षेत्रातील घोडबंदर, कळवा आणि मुंब्रा भागात गेल्या काही दिवसांपासून पाणी टंचाईची भीषण समस्या जाणवत असून या समस्येमुळे नागरिक अक्षरशः हैराण झाले आहेत. हि समस्या दूर होण्याऐवजी त्यात दिवसेंदिवस वाढ होत आहे.

त्याच्या निषेधार्थ कळव्यातील राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नगरसेवक अभिजीत पवार यांनी बुधवारी पालिका मुख्यालयाच्या प्रवेशद्वारावरच आंघोळ करून प्रशासनाचा निषेध नोंदविला. तसेच ही समस्या सुटली नाहीतर, आयुक्तांसह अधिकाऱ्यांच्या दालनात आंघोळ करण्याचा इशाराही दिला.

ठाणे महापालिका क्षेत्राची लोकसंख्या २७ लाख इतकी आहे. या लोकसंख्येच्या मानाने शहराला प्रतिदिन ६२१ दशलक्ष लीटर इतक्या पाण्याची गरज आहे. प्रत्यक्षात मात्र, ५९० दशलक्ष लीटर इतका पाणी पुरवठा होत असून शहराला ३१ दशलक्ष लीटर इतके पाणी कमी मिळत आहे. यामुळे तसेच वाढत्या लोकवस्तीमुळे शहरात पाणी टंचाईची समस्या निर्माण होत आहे. नवे ठाणे अशी ओळख असलेल्या घोडबंदर भागात पाणी टंचाईची समस्या जाणवत आहे.


त्याचबरोबर खाडी पल्ल्याड असलेल्या कळवा आणि मुंब्रा भागात गेल्या काही दिवसांपासून पाणी टंचाईची समस्या जाणवत असून ही समस्या अधिक तीव्र झाल्याने नागरिकांमधून



संताप व्यक्त होत आहे. घोडबंदर भागातील अनेक संकुलांना टँकरने पाणी विकत घ्यावे लागत आहेत. तर, कळवा आणि मुंब्रावासियांना टँकरही उपलब्ध होत नसल्यामुळे मेटाकुटीला आल्याचे चित्र आहे. दुरुस्ती कामे तसेच तांत्रिक बिघाडामुळे पाणी पुरवठ्यावर परिणाम होऊन टंचाईची समस्या निर्माण होत असल्याचा दावा पालिका प्रशासनाने यापुर्वी केला होता.

## बल्लारपुरात अतिक्रमण व अनियंत्रित वाहतुकीमुळे ट्रकच्या धडकेत एसटी वाहकाचा मृत्यू

**अक्षराज : वसंत वडस्कर**



**दि.११, बल्लारपूर (चंद्रपूर) :** बल्लारपूर शहर हे औद्योगिक दृष्ट्या महत्वाचे शहर असून चंद्रपूर जिल्ह्यातील दुसऱ्या क्रमांकाचे शहर म्हणून ओळखले जाते. याशिवाय बल्लारपूर व आसपासच्या परिसरातील अनेक उद्योगामुळं वाहतुकीचा प्रश्न गंभीर होत चाललेला आहे. तसेच बल्लारपूर शहरात वाढत्या अतिक्रमण ही निरपराध नागरिकांचा जीव घेण्यास कारणीभूत ठरत आहे. बल्लारपूर शहरात मुख्य रस्त्यांवर वाढलेल्या अतिक्रमणामुळे वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होत असल्याची नागरिकांची तक्रार आहे. अनेक दुकानदारांनी रस्त्यालगत दुकाने व साहित्य मांडल्याने रस्ते अरुंद झाले आहेत.

त्यामुळे वाहतूक कोंडीसह अपघातांची शक्यता वाढत असल्याने प्रशासनाने तातडीने अतिक्रमण हटविण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. मागील काही दिवसापूर्वी बल्लारपूर तहसील कार्यालय पार पडलेल्या जनता दरबार येथे पत्रकार बांधवानी बल्लारपूरातील अतिक्रमण व अनियंत्रित वाहतुकी संदर्भात जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले होते. त्यावर आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या असतांना बल्लारपूर शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, ग्रामीण रुग्णालय समोर आज सकाळी ११.३० वाजताच्या सुमारास ट्रकच्या धडकेत एका निरपराध व्यक्तीला आपले प्राण गमवावे लागले.

या संदर्भात अधिक माहितीनुसार मृतकाचे नाव श्रीराम मंग्या जाटोत (५५) रा. फुलसिंग नाईक वॉर्ड, बल्लारपूर असे असून ते चंद्रपूर एसटी आगारात वाहक म्हणून कार्यरत होते. ते घरगुती साहित्य आणण्यासाठी स्कूटी क्रमांक एमएच ३४ वाय ७०४१ ने जुना बसस्टँडकडे जात असताना ग्रामीण रुग्णालयाजवळ मागून येणाऱ्या ट्रक क्रमांक एमएच ३४ बीझेड ५८९७ ने त्यांच्या स्कूटीला जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात श्रीराम जाटोत यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. ट्रक चालक संतोष कृष्णकुमार टंडन (२७), रा. सिंदोला, ता. वणी, जि. यवतमाळ याला ताब्यात घेण्यात आले आहे. संबंधित ट्रक जेएसटी कंपनीचा असून तो पेपर मिलमधील राखड वाहून नेले जात होते. विशेष म्हणजे नगर परिषद चौकात ट्राफिक सिग्नल ही शोभेची वस्तू ठरली असून जवळपास २ वर्ष झाली ते वाहतूक दिवे बंद अवस्थेत आहेत. या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक बिपिन इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विक्की लोखंडे व पोलीस अंमलदार नरेंद्र वाकडे करीत आहेत.

## स्थायी समिती सभापती निवडीसाठी १६ मार्च रोजी विशेष बैठक

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.११, चंद्रपूर :** चंद्रपूर महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या सभापतीपदाची निवड करण्यासाठी १६ मार्च रोजी दुपारी १ वाजता विशेष बैठक आयोजित करण्यात आली आहे. ही बैठक महानगरपालिकेच्या गांधी चोक येथील नवीन प्रशासकीय इमारतीतील दुसऱ्या मजल्यावरील राणी हिराई सभागृहात पार पडणार आहे.

बैठक जिल्हाधिकारी तथा पिठासीन अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात येणार असून, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील संबंधित तरतूदीनुसार स्थायी समितीच्या सदस्यांमधून सभापतीपदाची निवड करण्यात येणार आहे.

सभापतीपदासाठी इच्छुक सदस्यांसाठी कोरे नामनिर्देशन पत्रे ११ मार्च ते १२ मार्च दरम्यान सकाळी ११ ते दुपारी ४ वाजेपर्यंत महानगरपालिका सचिव यांच्या कक्षात उपलब्ध राहतील. नामनिर्देशन पत्रे १३ मार्च रोजी सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील. त्यानंतर १६ मार्च रोजी सभा सुरु झाल्यानंतर नामनिर्देशनपत्रांची छाननी करण्यात येईल. वैध नामनिर्देशन पत्रे दाखल केलेल्या उमेदवारांना नामनिर्देशन पत्र मागे घेण्यासाठी १५ मिनिटांचा कालावधी देण्यात येईल.

जर एकापेक्षा अधिक उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात राहिले, तर मतदान प्रक्रिया पार पाडण्यात येणार असून, त्यानंतर निकाल जाहीर करण्यात येईल.

बैठकीला महानगरपालिकेचे सर्व स्थायी समिती सदस्य उपस्थित राहणार असून, निवडणूक प्रक्रिया नियमानुसार व पारदर्शक पध्दतीने पार पाडली जाणार असल्याची माहिती मनपा प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

## शेतकरी, ग्रामीण विकास आणि जनतेच्या प्रश्नांसाठी ठाम आवाज अर्थसंकल्पीय चर्चेत आ.दातेंची अभ्यासू भुमिका

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.११, पारनेर (अहिल्यानगर) :** महाराष्ट्र विधानसभेत सन २०२६–२७ च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेदरम्यान पारनेर–नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांनी अत्यंत अभ्यासपूर्ण आणि लोकाभिमुख भूमिका मांडत शेतकरी, ग्रामीण भाग आणि सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधले.

सभागृहात बोलताना त्यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पाचे स्वागत केले. तसेच दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या स्मृतींचा उल्लेख करत या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली असल्याचे नमूद केले.

**शेतकरी प्रश्नांवर ठाम भूमिका !**

अर्थसंकल्पातील दोन लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमाफीचा निर्णय स्वागतार्ह असुन नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही अधिक प्रोत्साहनपर अनुदान दिले पाहिजे. सध्या कांदा व टोमॅटो उत्पादक शेतकऱ्यांना अत्यंत कमी बाजारभाव मिळत असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडत असल्याचे आ. दाते यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून



दिले. तंत्रज्ञानासोबत शेतमालाला रास्त भाव मिळण्यासाठी ठोस धोरण आवश्यक असायला हवे. ग्रामीण विकासालाही समान प्राधान्य हवे शहरी भागात मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधा उभारल्या जात असताना ग्रामीण भागातील रस्ते, दळणवळण आणि मूलभूत सुविधांनाही तितकेच महत्त्व देणे गरजेचे असल्याने मुख्यमंत्री शेत पाणंद रस्ते योजना व रोजगार हमी योजनेतील पाणंद रस्त्यांची कामे एकत्रितपणे प्रभावीपणे राबविण्याचीही सूचना आ. दातेंनी केली.

**सौर कृषी पंप व वीजपुरवठ्याचा प्रश्न !**

मतदारसंघात सौर कृषी पंपासाठी अर्ज करूनही अनेक शेतकरी दीर्घकाळ प्रतीक्षा करत असल्याने सौर ऊर्जा प्रकल्पांची कामे गतीने पूर्ण करून शेतकऱ्यांना तातडीने सौर कृषी पंप उपलब्ध करून देण्याची मागणी त्यांनी सरकारकडे केली. तसेच ग्रामीण भागातील अपुरा वीजपुरवठाही त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिला. पशुधन आजाराबाबत तातडीची उपाययोजना कराव्या,

हिवरे बाजार परिसरातील गावांमध्ये पशुधनावर अज्ञात आजाराचा प्रादुर्भाव होऊन मोठ्या प्रमाणावर जनावरे मृत्युमुखी पडत असल्याची गंभीर बाब आहे. या आजाराचे तातडीने निदान करून शेतकऱ्यांचे झालेले नुकसान भरून काढण्यासाठी सरकारने मदत करावी.

अक्षराज



# महाराष्ट्राचे भाग्यविधाते यशवंतराव चव्हाण



महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री राष्ट्रीय राजकारणातले द्रष्टे नेते स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांची आज जयंती. यशवंतराव चव्हाण यांचा जन्म १२ मार्च १९१३ रोजी सातारा जिल्ह्यातील देवराष्ट्रे या छोट्याशा गावातील एका सामान्य शेतकरी कुटुंबात झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण कराड येथे झाले तर उच्चशिक्षण कोल्हापूर व पुणे येथे झाले. पुण्यात त्यांनी बीए - एलएलबीचे शिक्षण पूर्ण केले.

महात्मा गांधीजींच्या स्वातंत्र्याच्या आंदोलनाने प्रेरित होऊन त्यांनी स्वातंत्र्य संग्रामात भाग घेतला. १९३० साली त्यांनी महात्मा गांधीजींच्या सविनय आंदोलनात भाग घेतला. १९३२ साली त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. १९४२ च्या चले जाव आंदोलनातही त्यांनी भाग घेतला. सातारा जिल्ह्यातील भूमिगत चळवळीतही त्यांनी महत्वाची भूमिका बजावली. १९४६ सालच्या मुंबई प्रांताच्या विधिमंडळ निवडणुकीत दक्षिण सातारा मतदारसंघातून ते निवडले गेले आणि आणि संसदीय मंडळाचे चिटणीस बनले. १९४८ साली यशवंतरावांची काँग्रेसच्या चिटणीस पदावर निवड झाली. १९५२ च्या निवडणुकीनंतर ते स्थानिक स्वराज्य संस्था व पुरवठा खात्याचे मंत्री बनले.

द्विभाषिक राज्याचे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी १ नोव्हेंबर १९५६ रोजी सूत्र हाती घेतले. संयुक्त महाराष्ट्राचे स्थापना झाल्यावर ते महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री बनले. १ मे १९६० रोजी त्यांनी महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. मुख्यमंत्री असताना त्यांनी राज्यातील अनेक उपक्रमांना चालना दिली. महाराष्ट्राच्या विकासाची मुहूर्तमेढ त्यांनी रोवली म्हणूनच त्यांना महाराष्ट्राचे भाग्यविधाते म्हणतात. १९६२ साली चीनने भारतावर आक्रमण केले. देशाचे सार्वभौमत्व धोक्यात आले अशावेळी तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू यांनी यशवंतराव चव्हाण यांना दिल्लीत बोलावून त्यांची देशाच्या संरक्षणमंत्री नेमणूक केली. परकीय आक्रमणाच्या वेळी देश संकटात असताना हा सह्याद्री हिमालयाच्या मदतीला धावून गेला. चिनी आक्रमणानंतर संरक्षण दलात चैतन्य आणण्याची जबाबदारी त्यांनी यशस्वीरित्या पेलली.

१९६७ सालच्या निवडणुकीत अनेक राज्यात काँग्रेसचा पराभव झाला. त्याकाळात देशात अस्थिर परिस्थिती निर्माण झाली होती. त्या परिस्थितीत त्यांनी गृहखाते यशस्वीरित्या सांभाळले. अर्थमंत्री म्हणूनही त्यांची कारकिर्द गाजली. बांगलादेशचे युद्ध, दुष्काळ यामुळे खालावलेल्या देशाच्या अर्थव्यवस्थेला त्यांनी चालना दिली. संस्थानिकांचे तणखे रद्द करणे, बँकांचे राष्ट्रीयकरण करणे यासारखे महत्वाचे निर्णय ते अर्थमंत्री असतानाच घेतले गेले. चलनवाढीला आळा घालण्यासाठी कडक उपाययोजना करण्याचे धोरण देखील त्यांच्याच काळात आखण्यात आले. देशाचे परराष्ट्र मंत्री म्हणूनही त्यांनी काही काळ काम केले. पुढील काळात देशाच्या उपपंतप्रधानपदाची जबाबदारीही त्यांनी यशस्वीरित्या सांभाळली. देशात जनता पक्षाचे सरकार असताना ते विरोधी पक्षनेते होते. आठव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केले.

महाराष्ट्राचे भाग्यविधाते, कार्यक्षम मंत्री, उत्तम संसदपटू, उदारमतवादी नेते अशी जनमनसात त्यांची प्रतिमा निर्माण झाली. महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहासात त्यांनी मानाचा तुरा रोवला. महाराष्ट्राच्या या सुपुत्राने देशातच नव्हे, तर जगात महाराष्ट्राचे नाव उज्ज्वल केले.

यशवंतराव जितके महान नेते होते तितकेच ते अभिजात साहित्यिकही होते. ललित, आत्मचरित्र, चरित्रात्मक लेख, व्यक्तिचित्रणपर लेख, प्रवासवर्णन, स्फूटलेखन, वैचारिक लेख, समीक्षात्मक लेख, पत्रलेखन भाषणे, इत्यादी स्वरूपात त्यांनी विपुल लेखन केले आहे. त्यांच्या कृष्णाकाठ, ऋणानुबंध, युगांतर, भूमिका, शिवनेरीच्या नौबती, विदेश दर्शन, सह्याद्रीचे वारे या ग्रंथातून त्यांच्या लेखन प्रतिभेचा परिचय होतो. ते जरी राजकारणी असले तरी त्यांच्यामधील चिंतनशील रसिक, सामाजिक विचारवंत हा मात्र साहित्याबरोबरच राहिला होता. त्यांच्या सर्व कलाकृती लक्षवेधक आहेत.

यशवंतराव चव्हाण हे खऱ्या अर्थाने लोकनेते होते. भारतीय राजकारतील त्यांचे योगदान अद्वितीय असेच आहे. महाराष्ट्रासाठी तर त्यांचे योगदान अनमोल असेच आहे. महाराष्ट्र त्यांचे योगदान कधीही विसरू शकत नाही. २५ नोव्हेंबर १९८४ रोजी त्यांचे निधन झाले. आज त्यांच्या जयंतीदिनी त्यांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे. महाराष्ट्राचे भाग्यविधाते यशवंतराव चव्हाण यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**- श्याम ठाणेदार**

# जनसामान्यांसाठी अहोरात्र समर्पित असलेला नेता : खासदार निलेश लंके




**वाढदिवस विशेष !**

निलेश लंके यांनी १० मार्च २०१८ रोजी त्यांचा जन्मदिवस असल्याने वाढदिवसासाठी सुमारे ३० हजार लोक जमा झाल्याने कार्यकर्त्यांचे त्यांच्यावरील प्रेम दिसून आले. त्याच दिवशी त्यांनी कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव २०२९ ची विधानसभा निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला. सुरुवातीला निलेश लंके प्रतिष्ठान स्थापन करून राज्यात ठिकठिकाणी ऋनिलेश लंके प्रतिष्ठान' च्या शाखा उघडल्या. दरम्यानच्या काळात त्यांनी आपला जनसंपर्क व सामाजिक कार्याचा धडाका सुरूच ठेवला. निलेश लंके यांच्या कामाची व कार्याची दखल राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष खासदार शरदचंद्र पवार साहेब यांनी घेऊन. त्यांना राष्ट्रवादी पक्षातर्फे निवडणूक लढविण्याची संधी दिली. ३० जानेवारी २०१९ रोजी त्यांनी पारनेर येथे महासभा घेऊन मोठे शक्तिप्रदर्शन दाखवत राष्ट्रवादीमध्ये प्रवेश केला. निलेश लंके प्रतिष्ठानच्या माध्यमातून एक मोठा युवावर्ग त्यांच्या पाठीशी उभा राहिला. ५ ऑगस्ट २०१९ रोजी अजित पवार यांच्यासह अनेक राष्ट्रवादी नेत्यांच्या उपस्थितीत जनसंवाद यात्रा काढली. प्रत्येक गावागावात जाऊन लोकांच्या समस्या जाणून घेतल्या. या साऱ्याचा सुप्त परिणाम म्हणून पारनेर विधानसभा मतदारसंघातून सण २४ ऑक्टोबर २०१९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसने दिलेले उमेदवार निलेश लंके हे ६१ हजार विक्रमी मतांनी विजय प्राप्त केला. याचे सर्वात मोठे कारण म्हणजे राज्यातील निलेश लंके प्रतिष्ठानची सर्व यंत्रणा आणि शक्ती त्यांच्या मागे उभी राहिली होती. याचा सरळ अर्थ असा की, कोणतीही कारखानदारी किंवा संस्था यांच्या पाठबळाशिवायही निलेश लंके यांनी स्वतंत्र राजकीय शक्ती निर्माण केली आहे.

विजय संपादन केल्यानंतर ते सत्ताधाऱ्यांसोबत होते. मात्र, दोन वर्षे कोरोना संकट गेली. त्यांनंतर विरोधी बाकावर बसावे लागले. या काळात त्यांना मोठा संघर्ष करावा लागला. त्यांनी त्यांच्या साडेचार वर्षांच्या कालावधीत निधी खेचून आणण्यात ते विरोधात असूनही कूठेही कमी पडले नाहीत.

परंतु राजकीय परिस्थिती पुढे बदलत गेली. पडद्यामागून अनेक घटना घडत होत्या. दरम्यानच्या काळात राजकीय पटलावर आणखी एक नवीन घडामोड घडली होती. निलेश लंके राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे आमदार होते परंतु निवडणुकीपूर्वी त्यांनी आपल्या आमदारकीचा राजीनामा देऊन शरद पवार गटात दाखल झाले. महाविकास आघाडीकडून शरदचंद्र पवार यांनी त्यांना उमेदवारी दिली. दुरंगी लढतीत महायुतीकडून डॉ. सुजय विखे पाटील आणि महाविकास आघाडीकडून निलेश लंके यांच्यात लढत झाली. निलेश लंकेनी ६ लाख २४ हजार ७९७ मतं मिळवली तर सुजय विखे पाटील यांना ५ लाख ९५ हजार ८६८ मते मिळाली. २८ हजार ९२९ मतांच्या फरकाने निलेश लंकेनी विजय मिळवला.

याचे सर्वात मोठे कारण म्हणजे महाविकास आघाडीतील सर्व नेते, राज्यातील निलेश लंके प्रतिष्ठानचा युवावर्ग व कार्यकर्ते राष्ट्रवादी काँग्रेस पवार घराण्याची सर्व राजकीय शक्ती त्यांच्या मागे उभी राहिली होती. आज त्यांच्या समवेत सर्व जातीधर्माचे एस. सी.एस.टी., ओबीसी, मराठा, धनगर या प्रबळ जनसंख्येच्या वर्गाचे पाठबळ आहे.

अहिल्यानगर दक्षिण लोकसभा मतदारसंघामध्ये शेवगाव, राहुरी, पारनेर, नगर शहर, श्रीगोंदा, कर्जत –जामखेड ,पाथर्डी मतदारसंघ येतात.

कोणतीही गावे ही कोणाची जहागिरी किंवा गड नसतात, हे निलेश लंके यांनी सिद्ध करून दाखवले आहे. त्यांनी कर्जत जामखेड, पाथर्डी या भागात आपल्या समर्थकांचे जाळे निर्माण केले आणि निलेश लंके प्रतिष्ठानच्या युवक कार्यकर्त्यांची फळी उभारली आहे. गावपातळीवर, किंवा प्रभागात गेले तरी सरपंच आणि नगरसेवक सर्वसामान्यांचे फोन उचलताना दहा वेळा विचार करतात खासदार म्हटलं तर जवळपास सहा ते सात विधानसभा मतदारसंघाचा समावेश, आणि कमीतकमी २० ते २५ लाख लोकसंख्या त्यांचे प्रतिनिधित्व लोकसभा सदस्य निलेश लंके करतात. आपल्याला साधे दहा पंधरा फोन आले तरी आपण गांगारून जातो. मात्र खासदार म्हणून काम करत असताना निलेश लंके साहेब प्रत्येक सर्वसामान्य नागरिकांचा फोन उचलून त्यांची समस्या आणि प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करतात. खासदार लंके यांच्या संपर्क कार्यालयात आलेल्या व्यक्तीचे काम होणारच याची खात्री असते. त्यामुळे राज्याच्या विविध भागातून कामे घेऊन येणाऱ्या सर्वसामान्यांची रीघ लागलेली असते. खासदार निलेश लंके यांच्या कामाची यादी हनुमानाच्या शेपटीप्रमाणे वाढत जाणारी आहे. मतदारसंघात गावोगावी सुरू असलेले व पारनेर तालुक्यात जिल्ह्यातील सर्वात मोठ्या महाआरोग्ययज्ञाचे रक्तदान, महाआरोग्य शिबिर असो हे सर्व आयोजन करून खासदार निलेश लंके यांचा वाढदिवस साजरा होतो. याचे कारण म्हणजे जनतेला वाटणारा विश्वास निलेश लंके म्हणजे कामाचा माणूस, निलेश लंके म्हणजे आपला माणूस आणि निलेश लंके म्हणजे आमच्यासाठी जिवंत असलेला आयुर्विमा. राखावी बहुतांची अंतरे, भाग्य येते तदनंतर, या प्रमाणे भाग्य निलेश लंके यांच्या दिशेने चालत आहे. त्यामुळे केवळ अहिल्यानगर जिल्ह्यात नव्हे तर राज्यात खासदार निलेश लंके यांची लोकप्रियता वाढत आहे. स्वाभिमान आणि सत्व गहाण न टाकता, रणमैदानावर झुंजून मर्द मर्द मावळ्यांप्रमाणे दिग्विजय खेचून ते त्यांचे साम्राज्य नक्की निर्माण करतील, हा विश्वास त्यांच्या समर्थक जनतेला आहे. आणि हेच यश निलेश लंके यांचे आहे. लोकनेते निलेश लंके यांना वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांना हजारो शुभेच्छा...!



**- वसंत रांधवण**
**अहिल्यानगर जिल्हा प्रतिनिधी**
**मो.९४२१४३७१८१**

## चुली..



गॅस सिलेंडर्स गायब
कायसमस्या आली
प्रश्न गहन उद्भवला
आताकोण रे वाली

देशावरती आपत्ती
मदती आल्या चुली
आहो आम्ही सक्षम
भुकेवरी मारा फुली

चिंता ना करी मुळी
या अन्नपूर्णेच्यामुली
तोडगा त्वरित काढे
संकट आहे मामुली

जुने ते सोने म्हणता
गोष्ट ही खरी झाली
संस्कृतीचं सार्थश्रेष्ठ
पुनश्च प्रचिती आली

चुलीवरचास्वयंपाक
चविष्ट भोजन थाली
प्रगति मस्ती उतरली
अहंकार येता खाली

विस्तव वास्तव सांगे
अग्नीची कृपा भली
भुकाग्नीशांतवायला
चूल माऊली धावली

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

# भरपूर प्रवासी असतानाही केवळ अपुऱ्या बस सेवेअभावी ठाण्याची टीएमटी राज्यात तिसऱ्या स्थानी

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.१०, कळवा ( ठाणे) :** राज्यातील बेस्ट आणि पुणे परिवहना नंतर सर्वाधिक प्रवासी वाहतूक करणाऱ्या उपक्रमांमध्ये ठाण्याच्या 'टीएमटी'ने तिसरे स्थान पटकावले आहे. विशेष म्हणजे, ठाणे परिवहनशी स्पर्धा करणाऱ्या नवी मुंबई परिवहन (एनएमएमटी) उपक्रमातील प्रवाशांची संख्या घटली असून तो चौथ्या स्थानावर पोहोचला आहे. राज्यातील इतर अनेक परिवहन उपक्रमांतील बसची संख्या आणि त्यातून प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या अत्यंत कमी असल्याचे राज्याच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या आर्थिक पाहणी अहवालातून स्पष्ट झाले आहे.

स्वराज्य राज्यातील शहरी भागांतील नागरिकांसाठी स्थानिक संस्थांकडून परिवहन उपक्रमांद्वारे सार्वजनिक बससेवा उपलब्ध करून दिली जाते. मात्र, व्यवस्थापनातील तांत्रिक अडचणी आणि आर्थिक मर्यादांमुळे या सेवा अनेक ठिकाणी अपुऱ्या ठरत आहेत. मुंबई महानगर प्रदेशात लोकसंख्या जास्त असल्याने सार्वजनिक वाहतुकीची गरजही मोठ्या प्रमाणात भासते. प्रवाशांच्या तुलनेत अपुऱ्या बस, मार्गांवर तुरळक फेऱ्या आणि दिवसेंदिवस वाढणारा तोटा यामुळे ठाणे महानगरपालिकेचा परिवहन उपक्रम अडचणीत असला, तरी या उपक्रमातून गतवर्षी दररोज सुमारे अडीच लाख प्रवाशांनी प्रवास केल्याचे समोर आले आहे.

ठाणे परिवहन उपक्रमाने २०२४मध्ये दररोज ३०८ बसेसच्या माध्यमातून सरासरी १ लाख ८४ हजार प्रवाशांची वाहतूक केली होती. तर यंदा बसेसची संख्या ३५२पर्यंत वाढली असून त्यातून सुमारे २ लाख ४४ हजार प्रवाशांनी दररोज प्रवास केल्याचे समोर आले आहे. लोकसंख्येच्या तुलनेत बसेसची संख्या अत्यंत अपुरी असतानाही इतक्या मोठ्या प्रमाणात प्रवासी वाहतूक होत असल्याने शहरातील बस सेवेची गरज पुन्हा अधोरेखित झाली आहे.

ठाणे रेल्वे स्थानकाजवळील सॅटीस येथून सुटणाऱ्या बसेसमधून सर्वाधिक प्रवासी वाहतूक होत असून या बसेस घोडबंदर रोड, वर्तकनगर, लोकमान्य–सावरकर नगर, वागळे इस्टेट आणि कळवा या भागांत धावतात. वाढत्या प्रवाशांच्या पार्श्वभूमीवर या मार्गावर बसेसची संख्या वाढवण्याची मागणी प्रवाशांकडून केली जात आहे. राज्यात बेस्ट आणि पुणे परिवहनानंतर सर्वाधिक प्रवासी वाहतूक करण्याचा मान 'टीएमटी'ला मिळाला आहे.

ठाण्याची टीएमटी तिसऱ्या स्थानी असून नवी मुंबई महापालिकेच्या एनएमएमटी कडून




दररोज ३१७ बसेसद्वारे सुमारे १ लाख ९३ हजार प्रवाशांची वाहतूक होत आहे. २०२४ मध्ये एनएमएमटी कडून ३६७ बसेसच्या माध्यमातून दररोज २ लाख १ हजार प्रवाशांना सेवा देण्यात आली होती. त्यामुळे या वर्षी प्रवासी आणि बसेसची संख्या घटल्याचे स्पष्ट झाले आहे. या आकडेवारीवरून मुंबई महानगर प्रदेशात वाढत्या प्रवाशांसाठी सार्वजनिक वाहतुकीची गरज अधिक तीव्र असल्याचे दिसून येते.

कल्याण–डोंबिवली परिवहनमधून यंदा ६१ फेऱ्यांमधून सुमारे ४२ हजार प्रवाशांना सेवा देण्यात आली. मिरा–भाईंदर परिवहन उपक्रमाच्या बसेसची संख्या ७७वरून ९१ पर्यंत वाढली, तर प्रवासी संख्या ८२ हजारांवरून ८९ हजारांपर्यंत वाढली आहे. यंदा उल्हासनगरमध्ये नव्याने परिवहन सेवा सुरू झाली असून दररोज ७ फेऱ्यांद्वारे सुमारे ५ हजार प्रवासी प्रवास करत असल्याचे समोर आले आहे.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## नागपूर येथे होणाऱ्या मराठी कवी संमेलनाच्या अध्यक्षपदी प्रा.डॉ.संग्राम आंदे यांची निवड

अक्षराज : अशोक लोणीकर

**दि.११, मुखेड (नांदेड) :** मुखेड तालुक्यातील महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागातील प्रा.डॉ.संग्राम आंदे यांची एप्रिल मध्ये नागपूर येथील होणाऱ्या कवी संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. नागपूर येथील नागपूर कवी कट्टा तर्फे भव्य काव्य स्पर्धा आणि मराठी कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये विद्यार्थीतील नामवंत कवींचा सहभाग होणार आहे.

त्यांनी आतापर्यंत अनेक साहित्य संमेलनात सहभाग नोंदवला आहे आणि आपल्या साहित्यातून आपले प्रकट मत व्यक्त केले आहे. त्यांनी अनेक काव्य संमेलनात सहभाग नोंदवला आहे. त्यांनी अनेक विषयावर आर्टिकल लिहिले आहेत. त्यांचा अनेक विषयावरचा अभ्यास हा महत्वपूर्ण आहे म्हणून त्यांची नागपूरच्या कवी संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. त्याबद्दल त्यांचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अडकिने एस. बी., प्राचार्य मस्के, प्राचार्य गोणे, नेटके प्रा.आहेर इत्यादीनी अभिनंदन केले आहे.

## केडीएमसी मुख्य प्रवेशद्वाराला स्व.अजित पवार यांचे नाव देण्याची मागणी...



अक्षराज : भानुदास गायकवाड

**दि.११, कल्याण :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार गट) चे प्रदेश सचिव वल्ली एस. राजन यांनी कल्याण–डोंबिवली महानगरपालिकेच्या नवनियुक्त महापौर ॲड. सौ. हर्षाली ताई चौधरी यांची सदिच्छा भेट घेत त्यांना पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. त्यांच्या नेतृत्वाखाली कल्याण–डोंबिवली शहराच्या सर्वांगीण विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

या भेटीदरम्यान महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या कार्याचा गौरव करण्याच्या उद्देशाने कल्याण–डोंबिवली महानगरपालिकेच्या मुख्य प्रवेशद्वाराला त्यांचे नाव देण्यात यावे, अशी मागणी वल्ली एस. राजन यांनी केली. यासंदर्भात त्यांनी महापौर हर्षाली चौधरी यांना निवेदनही सादर केले.

स्व. अजितदादा पवार यांच्या आकस्मिक निधनामुळे संपूर्ण महाराष्ट्रात शोककळा पसरली असून राज्याच्या विकासासाठी त्यांनी दिलेले योगदान मोलाचे असल्याचे राजन यांनी नमूद केले. त्यांच्या कार्यामुळे महाराष्ट्राच्या प्रगतीला मोठी चालना मिळाली असून जनसामान्यांमध्ये त्यांच्याबद्दल विशेष आदर व प्रेम निर्माण झाले आहे. त्यामुळे त्यांच्या कार्याचा सन्मान म्हणून महानगरपालिकेच्या मुख्य प्रवेशद्वाराला त्यांचे नाव देण्याचा सकारात्मक निर्णय महानगरपालिका प्रशासन घेईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी – विमुक्त भटक्या जमाती सेलचे कल्याण जिल्हाध्यक्ष दिनेश परदेशी तसेच राष्ट्रवादी काँग्रेस, कल्याण–डोंबिवली जिल्हा (अजित पवार गट) पक्षाचे सरचिटणीस संतोष सरस्वती बळीराम पाटील उपस्थित होते.

## सोयगांव पंचायत समितीच्या सभापतीपदी उत्तम चव्हाण तर उपसभापती गयाबाई घोडे यांची बिनविरोध निवड



अक्षराज : पूनम परदेशी

**दि.११, सोयगांव :** पंचायत समिती च्या सभापती व उपसभापती पदासाठी एक–एक उमेदवारी अर्ज दाखल झाल्यामुळे सभापती पदी भाजप चे उत्तम महारू चव्हाण तर उपसभापती शिवसेनेच्या गयाबाई गोविंद घोडे हे बिनविरोध निवडून आल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी एकनाथ बंगाळे यांनी घोषित केले.

सोयगांव पंचायत समितीच्या सभागृहात भाजप तीन, शिवसेना दोन, उबाठा एक असे पक्षीय बलाबल आहे. आज सोयगाव पंचायत समिती च्या सभागृहात उपजिल्हाधिकारी तथा पिठासिन अधिकारी एकनाथ बंगाळे यांच्या अध्यक्षतेखाली सोयगांव पंचायत समिती च्या सभापती, उपसभापती पदाची निवडणूक घेण्यात आली. सभापती पदासाठी उत्तम महारू चव्हाण यांचा एकमेव अर्ज दाखल झाला. तसेच उपसभापती पदासाठी गयाबाई गोविंद घोडे यांचा एकमेव अर्ज दाखल झाला होता. दुपारी दोन वाजता पिठासिन अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली निवडीची बैठक घेण्यात आली. या बैठकीत सभापती पदासाठी उत्तम चव्हाण यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्यामुळे त्यांची सभापती पदी निवड झाल्याचे घोषित करण्यात आले. तर उपसभापती पदासाठी गयाबाई गोविंद घोडे यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्यामुळे त्यांची बिनविरोध निवड झाल्याचे घोषित करण्यात आले. नवनिर्वाचित सभापती, उपसभापती चे पंचायत समितीचे गटविकास अधिकारी शिवाजी यमूलवाड यांनी स्वागत केले.

सभापती व उपसभापती पदाची बिनविरोध निवड घोषित होताच भाजप शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष केला. यावेळी सभपती उत्तम चव्हाण यांचे भाजप अल्पसंख्याक प्रदेश अध्यक्ष इद्रिस मुलतानी, जि.प. सदस्य पुष्पाताई काळे, भाजप तालुकाध्यक्ष संजय पाटील, पंचायत समिती सदस्य अंकुश राठोड, जयश्री पवार, पंजाबराव कोलते, शिवाजी बुढाळ, जयप्रकाश चव्हाण, सुनील गव्हांडे, गणेश लोखंडे, वसंत बनकर, गुलाबराव कोलते, शांताराम खराटे, बद्री राठोड, संजीवन सोनवणे, राजेंद्र जावळे, योगेश पाटील, प्रमोद पाटील, अण्णासाहेब तांगडे, समाधान बावस्कर, कैलास काळे आदींसह अनेकांनी स्वागत केले.

# मंत्री शंभूराजे देसाई यांच्या उत्तरावरून माथेरान मध्ये संताप!

## माथेरानमध्ये मूलभूत सुविधा व निधीच्या हिशोबाची मागणी...

अक्षराज : चंद्रकांत सुतार

**दि.११, माथेरान :** रायगड जिल्ह्यातील पर्यटनस्थळ असलेल्या माथेरान येथे मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत विधानसभेत विचारण्यात आलेल्या तारांकित प्रश्नानंतर आता स्थानिक नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. पर्यटनस्थळ म्हणून आंतरराष्ट्रीय ओळख असलेल्या माथेरानमध्ये प्रत्यक्षात रस्ते, पार्किंग, ई-रिक्षा व्यवस्था, स्वच्छतागृहे आणि पिण्याच्या पाण्यासारख्या मूलभूत सुविधांची मोठी कमतरता असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

विधानसभेत हा तारांकित प्रश्न आमदार चित्रा वाघ, प्रसाद लाड प्रवीण दरेकर यांनी उपस्थित केला होता. या प्रश्नाला उत्तर देताना राज्याचे पर्यटन मंत्री शंभूराजे देसाई यांनी माहिती दिली की प्रादेशिक पर्यटन विकास योजनेअंतर्गत माथेरान येथे मूलभूत सुविधा उभारण्यासाठी सुमारे ₹५५१.२९ लाखांच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली




असून त्यापैकी सुमारे ₹२९४.२८ लाख निधी माथेरान गिरिस्थान नगरपरिषदेला वितरित करण्यात आला आहे.

मात्र मंत्र्यांच्या या उत्तरानंतर सोशल मीडियावर आणि स्थानिक पातळीवर मोठ्या प्रमाणात नाराजी व्यक्त केली जात आहे. स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे की, प्रत्यक्षात माथेरानमध्ये कोणतेही मोठे काम झाल्याचे दिसून येत नाही. अनेक ठिकाणी रस्त्यांची दुरवस्था कायम आहे, ई-रिक्षा व्यवस्थेमध्ये अनियमितता आहे, तसेच पर्यटकांसाठी स्वच्छतागृहे आणि पिण्याच्या पाण्याची सुविधा अपुरी असल्यामुळे पर्यटकांनाही अडचणींचा सामना करावा लागत आहे.

पर्यटन हंगामात दरवर्षी हजारो देशी–विदेशी पर्यटक माथेरानला भेट देतात. मात्र मूलभूत सुविधा नसल्यामुळे पर्यटक नाराजी व्यक्त करत असल्याचेही स्थानिकांनी सांगितले. विशेष म्हणजे मंत्र्यांनी दिलेल्या उत्तरात कामांना मंजुरी व निधी वितरित केल्याचा उल्लेख असताना प्रत्यक्षात ती कामे कुठे आणि कशी झाली याबाबत स्पष्टता नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.या पार्श्वभूमीवर नागरिकांनी संबंधित विभाग व नगरपरिषदेकडून निधीचा सविस्तर हिशोब जाहीर करावा, अशी मागणी केली आहे. मंजूर झालेल्या निधीतून नेमकी कोणती कामे करण्यात आली, कोणत्या ठिकाणी सुविधा उभारण्यात आल्या आणि त्याचा लाभ नेमका कोणाला झाला याची माहिती सार्वजनिक करावी, अशी मागणी जोर धरत आहे.मंत्रालयात दिलेल्या उत्तरामुळे माथेरानमध्ये प्रचंड संतापाचे वातावरण निर्माण झाले असून, नागरिकांनी याप्रकरणी चौकशी करून सत्य परिस्थिती समोर आणण्याची मागणी केली आहे. अन्यथा पर्यटनस्थळाच्या विकासाच्या नावाखाली निधी खर्च होऊनही प्रत्यक्षात सुविधा नसल्याचा गंभीर प्रश्न निर्माण होत असल्याची प्रतिक्रिया स्थानिकांकडून व्यक्त केली जात आहे.

# गहलोत इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी येथे स्वसंरक्षण जनजागृती कार्यक्रम

अक्षराज : प्रतिनिधी

**दि.११, नवी मुंबई :** गहलोत इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी कोपरखैरणे, नवी मुंबई येथे जागतिक महिला दिनानिमित्त विद्यार्थ्यांसाठी स्वसंरक्षण जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये स्वसंरक्षणाबाबत जागरूकता निर्माण करणे तसेच आत्मविश्वास वाढवणे हा होता.

हा कार्यक्रम वॉरियर तायक्वांदो अकॅडमीचे प्रशिक्षक मंगेश औटी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना विविध स्वसंरक्षण तंत्र, धोकादायक परिस्थितीत स्वतःचे संरक्षण कसे करावे, तसेच आत्मविश्वास





आणि सतर्कता यांचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. तसेच काही तंत्रांचे प्रात्यक्षिकही विद्यार्थ्यांसमोर सादर करण्यात आले.

या कार्यक्रमात सार्थक जौरत, श्रीजा कहाडाने आणि वाय.के.यादव यांनीही सक्रिय सहभाग घेतला व प्रात्यक्षिकांमध्ये सहकार्य केले. कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. महाविद्यालयाचे प्राचार्य व व्यवस्थापन यांनी मंगेश औटी व त्यांच्या टीमचे कौतुक करून त्यांना प्रशंसापत्र देऊन सन्मानित केले.

कार्यक्रमाच्या शेवटी अशा प्रकारचे स्वसंरक्षण जनजागृती कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त असून भविष्यातही असे उपक्रम आयोजित करण्याची गरज व्यक्त करण्यात आली.

# दिल्ली येथे किसन नागरकर यांना 'सर्वोत्कृष्ट टेक्निशियन' म्हणून केले सन्मानित

अक्षराज : वसंत वडस्कर

**दि.११, चंद्रपूर :** अ.ऊ.दा. स.व.सु. बल्लारशा डिव्हिजन चंद्रपूर येथील २२० केव्ही उपकेंद्र ताडाळी येथे कार्यरत किसन दामोधर नागरकर टेक्निशियन – २ यांना दिल्ली येथे बेस्ट टेक्निशियन म्हणून सन्मान करण्यात आले.

जन्मगाव पडोली व चिंचाळा गावचे रहिवासी किसन दामोधर नागरकर यांचे समर्पित सेवा, कठोर परिश्रम व उत्कृष्ठ कार्याची दखल घेत दिल्ली येथे प्रतिष्ठेचा सन्मान प्रदान करण्यात आला.

वीज पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी प्रतिकूल परिस्थितीतही जीवाची पर्वा न करता कार्य करणाऱ्या टेक्निशियन




च्या सेवेला गौरवण्यासाठी हा पुरस्कार दिला जातो. नागरकर यांनी महापारेषण कार्यरत असताना वीज महापारेषण व्यवस्थेत सातत्याने विश्वासार्ह सेवा व अंगी असलेल्या कलागुणांनी कंपनीच्या वाढीस हातभार मध्ये योगदान दिले आहे. यासाठी त्यांना २०२५ मध्येही महाराष्ट्र शासनाचा.. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ मुंबई येथे विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कार मिळाला होता. कार्यातील प्रामाणिकपणा, तत्परता, सोबतच होतकरू विद्यार्थांचे एज्युकेशन, आरोग्य, अशा विविध सामाजिक क्षेत्राचे कार्य, जबाबदारीची भावना लक्षात घेऊन त्यांची या राष्ट्रीय पुरस्काराची निवड करण्यात आली.

दिल्ली येथे द स्टिन ऑडिटोरियम इंडिया हॅबिटेड सेंटर लोधी रोड येथे केंद्रीय ऊर्जा व नवीन अक्षय ऊर्जा राज्यमंत्री श्रीपाद नाईक यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. केंद्रीय विद्युत प्राधिकरणाचे अध्यक्ष घनश्याम प्रसाद, भारत सरकारच्या विद्युत मंत्रालयाचे सचिव पंकज अग्रवाल, तसेच टाटा पॉवर चे कार्यकारी संचालक यांची प्रमुख उपस्थिती होती. किसन नागरकर यांच्या राष्ट्रीय कामगिरी मुळे पडोली, चिंचाळा गावा सोबतच पूर्ण चंद्रपूर जिल्हा परिसरात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# चिरनेरच्या 'बाल आनंद मेळाव्या'त चिमुरड्यांनी गिरवले व्यवहाराचे धडे

अक्षराज : संग्राम ठाकूर

**दि.११, उरण (रायगड) :** रायगड जिल्हा परिषदेच्या आदर्श केंद्र शाळा चिरनेर येथे आज 'बाल आनंद मेळावा आणि खाद्य जत्रा' अत्यंत उत्साहात संपन्न झाली, पुस्तकी ज्ञानाला व्यावहारिक जोड देत विद्यार्थ्यांनी स्वतः विविध पदार्थांचे स्टॉल्स मांडून आपल्यातील 'भावी उद्योजका'ची झलक दाखवून दिली.

या मेळाव्यात एकूण १९५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत ग्रामस्थांची मने जिंकली, कार्यक्रमाची सुरुवात चिरनेर केंद्राचे केंद्रप्रमुख दर्शन पाटील यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आली. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सचिन म्हात्रे यांनी मेळाव्याचे अधिकृत उद्घाटन केले, यावेळी मंचावर ग्रामपंचायत सदस्या भारतीताई ठाकूर, सामाजिक कार्यकर्ते बापू मोकल, प्रथम इन्फोटेक फाउंडेशनचे निलेश ठाकूर, पत्रकार संग्राम ठाकूर, रायगड जिल्हा आदर्श पुरस्कार प्राप्त शिक्षक बी. जे. म्हात्रे, माजी सरपंच पद्माकर फोफेरकर, शेतीनिष्ठ शेतकरी प्रफुल्ल



खारपाटील, पोलीस पाटील संघटनेचे संजय पाटील अरुण ठाकूर, समाधान म्हात्रे, अशोक कांबळे, हिम्मत केणी, दामोदर केणी, पत्रकार आनंद नारंगीकर, प्रवीण म्हात्रे, बरकडे सर तसेच शाळा व्यवस्थापन समितीच्या सर्व सदस्य आणि सदस्या, सर्व शिक्षकवृंद शाळेची मदतनीस रंजना म्हात्रे आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

शाळेचे मुख्याध्यापक बळीराम पाटील सर यांनी प्रास्ताविकातून या मेळाव्याची भूमिका मांडली. केवळ पुस्तकी शिक्षण न देता विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनातील गणित, संवाद कौशल्य आणि व्यावहारिक जगातील व्यवहारांचे ज्ञान मिळावे, हा या मेळाव्याचा मुख्य उद्देश आहे, असे त्यांनी नमूद केले.

सकाळी ८ ते ११ या वेळेत शाळेचे प्रांगण विविध खाद्यपदार्थांच्या सुवासाने दरवळले होते, यावेळी मेळाव्यात परिसरातील ताज्या पालेभाज्यांचे स्टॉल्स लावून पौष्टिक आहाराचा संदेश देण्यात आला, निवृत्त जिल्हा नियोजन अधिकारी श्रीधर मोकल, केंद्रप्रमुख दर्शन पाटील, निवृत्त केंद्रप्रमुख अशोक कांबळे, आदर्श शिक्षक पुरस्कार विजेते बी.जे. म्हात्रे, निलेश ठाकूर, प्रफुल्ल खारपाटील यांनी विद्यार्थ्यांच्या कौशल्याचे मुक्तकंठाने कौतुक केले, गावातील पालक वर्ग आणि शाळेच्या माजी विद्यार्थ्यांनी या जत्रेला मोठ्या संख्येने उपस्थित राहून मनमुराद आनंद लुटला, इयत्ता पहिली ते चौथीच्या चिमुरड्यांनी दाखवलेला आत्मविश्वास पाहून उपस्थितांनी त्यांचे विशेष कौतुक केले. कार्यक्रमाच्या शेवटी निर्भय म्हात्रे यांनी उपस्थित सर्व मान्यवर, पालक आणि शिक्षक वृंदांचे आभार मानले.

# तवली-ठाकरवस्ती ते दरेकर वस्ती रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.११, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील म्हसोबा झाप-कन्हेर येथे आमदार काशिनाथ दाते यांच्या स्थानिक विकास निधीतून मंजूर झालेल्या तवली – ठाकरवस्ती ते दरेकर वस्ती रस्त्याच्या खडीकरण व मजबुतीकरण कामाचे भूमिपूजन डॉ.प्रदीप दाते यांच्या उपस्थितीत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. या रस्त्यासाठी १० लाख रुपयांच्या निधीस प्रशासकीय मंजुरी मिळाल्याने परिसरातील ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. सदर रस्ता पूर्ण झाल्यानंतर स्थानिक नागरिकांच्या दैनंदिन वाहतुकीस मोठी सोय होणार असून शेतकरी, विद्यार्थी तसेच कामानिमित्त ये-जा करणाऱ्या ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळणार आहे. विशेषतः पावसाळ्यात होणाऱ्या अडचणी कमी होऊन गावकुसातील वस्तीपर्यंत सहज वाहतूक होणार असल्याने ग्रामस्थांनी या विकासकामाचे स्वागत करत आमदार दाते यांचे आभार मानले.



यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना डॉ. प्रदीप दाते म्हणाले की, शेतकरी, कष्टकरी व सर्वसामान्य जनतेप्रती आमदार काशिनाथ दाते यांना असलेली आत्मीयता आणि जिव्हाळा हा मतदारसंघाच्या विकासाचा खरा पाया आहे. जोपर्यंत आ. दाते मतदारसंघाचे नेतृत्व करत आहेत, तोपर्यंत सामान्य माणसाला न्याय मिळत राहील याबाबत मला अजिबात शंका नाही.

ते पुढे म्हणाले की, आज संपूर्ण मतदारसंघात सुरू असलेल्या सर्वसमावेशक विकासकामांचा वेग हा सरांच्या जनसामान्यांप्रती असलेल्या आपुलकीचे प्रतिक आहे. सामान्यातल्या सामान्य व्यक्तीलाही आमदार दाते सरांशी बोलण्यासाठी कोणत्याही मध्यस्थीची गरज भासत नाही, हीच त्यांच्या नेतृत्वाची खरी ताकद आहे.

सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या ऐकून त्यांना न्याय मिळावा. यासाठी आमदार दाते दर सोमवारी पारनेर येथे आणि शुक्रवारी नगर येथील संपर्क कार्यालयात दिवसभर नागरिकांच्या भेटीसाठी उपलब्ध राहतात, असेही त्यांनी सांगितले. मतदारसंघाच्या कानाकोपऱ्यातून आशा घेऊन आलेला प्रत्येक नागरिक समाधानी होऊन परत जावा, हा त्यांचा कायमचा अट्टाहास असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. याप्रसंगी रंगनाथ दाते, महादू आहेर, पोपट आहेर, सुखदेव आहेर, मारुती दरेकर, राजेंद्र भालके, संतोष जाधव, बबन दरेकर, सुभाष आहेर, चंदुशेठ दरेकर उपस्थित होते.

# पेण पंचायत समितीच्या सभापती स्मिता पाटील, उपसभापती पदावर संजय डंगर बिनविरोध निवड

**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.११, पेण (रायगड) :** एक हाती खासदार धैर्यशील पाटील यांचे वर्चस्व असलेल्या पेण पंचायत समिती सभापती उपसभापती पदाची निवडणूक आज पेण प्रांत अधिकारी प्रविण पवार यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली सभापती पदासाठी स्मिता प्रमोद पिंट्याशेट पाटील यांचा तर उपसभापती पदासाठी संजय कमळाकर डंगर यांचा असे दोनच अर्ज दाखल झाले. त्यामुळे सभापती, उपसभापती पदाची औपचारिकता शिल्लक होती.निवडणूक निर्णय अधिकारी प्रवीण पवार यांनी दुपारी २.००वाजता सभापती पदावर स्मिता पाटील तर उपसभापती पदासाठी संजय डंगर यांची नियुक्ती झाल्याचे घोषित करुन प्रशस्तीपत्र व पुष्पगुच्छ देऊन सभापती व उपसभापतीचे अभिनंदन केले. यानंतर नवनिर्वाचित सभापती उपसभापती यांचे अभिनंदन करण्यासाठी खासदार धैर्यशील पाटील माजी जिल्हा परिषद अध्यक्षा नीलिमा पाटील नगराध्यक्ष प्रितम पाटील व भाजपचे पदाधिकारी यांनी मोठ्या संख्येने गर्दी करीत पुष्पगुच्छ देऊन नवनिर्वाचित सभापती स्मिता पाटील व उपसभापती संजय डंगर यांचे अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.

या निवडणुक विशेष सभेत भाजपचे सभापती स्मिता पाटील उपसभापती संजय डंगर नवनिर्वाचित सदस्यांमध्ये गटनेते विवेक सदानंद म्हात्रे, प्रदीप मधुशेट म्हात्रे, सुशांत खाकर, मेघा मंच्छीद्र पाटील कमळ पवार, अस्मीता प्रल्हाद पाटील, व शिवसेना उबाठाचे संजय भोईर व प्रिती प्रशांत पाटील यांची उपस्थिती होती.



सभापती पदासाठी आज सकाळी ११ ते १.०० वाजेपर्यत नामनिर्देशन दाखल करण्याच्या वेळेत सभापती पदासाठी स्मिता प्रमोद पाटील यांचा एकमेव अर्जावर सूचक संजय डंगर यांची स्वाक्षरी तर उपसभापती पदासाठी संजय डंगर यांचे अर्जावर सूचक मेघा मंच्छीद्र पाटील यांच्या सहीनीशी अर्ज दाखल करण्यात आले. विरोधी पक्षाचे शिवसेना उबाठा गटातील संजय भोईर यांचीही विशेष उपस्थिती होती. त्यामुळे सभापती व उपसभापती पदाची निवडणूक बिनविरोध होऊन विनातक्रार आंनदी माहोलात उत्साहात पार पडली.नव्या सभापती आणि उपसभापतीनी एकमेकांना शुभेच्छा देत आपापल्या दालनात जाऊन कार्यभार स्वीकारला. यावेळी सभापती स्मिता पाटील यांनी बोलताना माझ्या सर्व सहकारी सदस्यांना विश्वासात आणि सोबत घेऊन पंचायत समिती समितीतील प्रशासन पारदर्शकतेनेजनतेला कोणत्याही प्रकारची अडचण भासू देणार नसल्याचे स्पष्ट सांगितले.

# युद्धाच्या पार्श्वभूमीवर माथेरानमध्ये कमर्शिअल गॅस टाकी टंचाईचे सावट पर्यटन हंगामात व्यवसाय चिंतेत



आमचे माथेरान मध्ये छोटे कॅन्टीन हॉटेल्स आहे यामध्ये आम्ही वडापाव चा ऑफिस विकत असतो परंतु कमर्शियल कॅश टाकी २००० रुपयाला केलेली आहे त्यामुळे दर वाढला आणि मुख्यतः म्हणजे आता गेले दोन दिवस ती कमर्शियल गॅस टाकी उपलब्ध होत नाहीये त्यामुळे हॉटेल बंद करण्याची वेळ आलेली आहे ज्या काही गॅस टाकी आहे त्याच्यावरच हॉटेल चालू ठेवणे आणि जे दैनंदिन वडापावच्या कॉफी विकत होतो त्याचे पण दर वाढवणे आम्हाला कमप्रात आहे याचा फटका दुकानदारांबरोबर ग्राहकांनाही बसतो आहे.

**- संतोष पवार (व्यावसायिक)**

आमचे माथेरान मार्केटमध्ये हॉटेल आहे. सध्या कमर्शियल गॅस टाकी यांचा प्रचंड तुटवडा जाणवत आहे गॅस टाकी उपलब्ध नाहीये त्याच्यामुळे शिल्लक असलेल्या गॅस टाकी वर व्यवसाय करावा लागतो आणि गॅसचे दर २००० रुपये दर वाढवल आहे. त्यामुळे व्यवसाय बंद करण्याची पाळी आली आहे, आणि व्यवसायामध्ये आमचे दरी वाढवण्याशिवाय आम्हाला अत्यंत फायदा नाहीये गॅस कमर्शिअल गॅस टाकी यामध्ये वजनामध्ये पण फार तफावत आहे. कारण गॅस टाकी वेळ आधीच संपते त्यामुळे सर्व बाजूने आमच्यावर संकट कोसळले आहे.

**- संतोष कदम (मराठा तडका हॉटेल मालक)**

**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.११, माथेरान :** थंड हवेचे पर्यटनस्थळ असलेल्या माथेरानमध्ये सध्या घरगुती आणि व्यावसायिक गॅसच्या समस्येमुळे नागरिक तसेच हॉटेल व्यावसायिकांची कोंडी झाली आहे.

आंतरराष्ट्रीय स्तरावर सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थितीमुळे इंधन पुरवठ्यावर परिणाम होत असून त्याचे पडसाद देशभरात उमटत आहेत. त्याचा परिणाम माथेरानमध्ये ही दिसू लागला आहे.सध्या कमर्शियल गॅस टाकी कमतरता भासत आहे.

त्यामुळे आधीच वाढलेल्या दरांमुळे गॅस मिळणेही कठीण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.याचा सर्वाधिक फटका हॉटेल, लॉज आणि खानावळी चालवणाऱ्या व्यावसायिकांना बसत आहे. उन्हाळ्याचा पर्यटन हंगाम सुरू होत असताना गॅस टंचाई निर्माण झाल्यास अन्नपदार्थ तयार करणे कठीण होऊन पर्यटन व्यवसायावर परिणाम होण्याची शक्यता आहे.

घरगुती गॅस टाकी सध्या मिळत असली तरी मनात भीती कायम असल्याने काही कुटुंबांना पर्याय नसल्याने पुन्हा चुलीवर स्वयंपाक करण्याचा विचार करावा लागत आहे. मात्र जंगल परिसरात लाकूड गोळा करण्यावर निर्बंध असल्याने हा पर्यायही सोपा नाही.गॅसचे वाढते दर, बुकिंग प्रक्रियेतील अडथळे आणि पुरवठ्यातील अनिश्चितता यामुळे माथेरानमधील नागरिक आणि व्यावसायिकांमध्ये चिंता वाढली आहे. त्यामुळे गॅस पुरवठा सुरळीत करण्यासाठी प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी स्थानिकांकडून होत आहे.

# धाराशिव शहरातील कचरा डेपोचा प्रश्न मार्गी लागणार - नेहा काकडे

**अक्षराज : विकास वाघ**

**दि.११, धाराशिव :** पुणे येथील ग्रीन पृथ्वी सोल्युशन या कचऱ्यावर प्रक्रिया करणाऱ्या कंपनीस नगर परिषदेच्या शिष्टमंडळाने दि.१० मार्च रोजी भेट दिली. तसेच प्रक्रिया संयंत्र केंद्र ( प्रोसेस प्लांट) ची पाहणी केली. यावेळी कंपनीच्यावतीने आसाराम काळे यांनी शिष्टमंडळास कचऱ्यावर कशा पद्धतीने प्रक्रिया केली जाते ? त्यामुळे कचऱ्याची समस्या दूर होऊन त्याचा सकारात्मक परिणाम काय होतो ? याची सविस्तरपणे माहिती दिली.

तसेच धाराशिव येथील कचरा डेपो संदर्भात कोणत्या उपाययोजना कराव्या लागतील ? यासंदर्भात शिष्टमंडळाने त्यांच्याशी चर्चा केली. त्यावेळी ज्या पद्धतीने पुणे येथील कचऱ्यावर प्रक्रिया करून येथील कचऱ्याच्या समस्या सोडविल्या आहेत. अगदी तसाच प्रयोग धाराशिव येथील कचरा डेपोच्या संदर्भात केला जाईल असे आश्वासन काळे यांनी दिले. त्यामुळे



धाराशिवमधील कचरा डेपोतील कचऱ्यामुळे उद्भवलेल्या समस्या लवकरच सोडविल्या जातील. त्या संदर्भात नगर परिषदेकडून सकारात्मक ठोस आणि सकारात्मक पावले उचलली जात आहेत. लवकरच धाराशिवमधील कचरा डेपोमधील कचऱ्यावर प्रक्रिया (प्रोसेस) करून या कचऱ्याच्या दुर्गंधीपासून निर्माण होणाऱ्या सर्व समस्या लवकरच निश्चितपणे संपुष्टात आणण्यात येणार असल्याची माहिती नगराध्यक्ष नेहा राहुल काकडे व मुख्याधिकारी नीता अंधारे यांनी दिली आहे.

तसेच या कचऱ्यामुळे नागरिकांच्या सर्व समस्येवर कायमस्वरूपी इलाज केला जाणार आहे. विशेष म्हणजे नगर पालिका निवडणूक प्रचार दरम्यान दिलेल्या आश्वासनाच्या पूर्तीच्या दिशेने हे अतिशय महत्त्वाचे पाऊल उचलले असल्याचे काकडे यांनी आवर्जून सांगितले. तसेच कचरा डेपो आणि कचऱ्यावरून होणारे राजकारण यापुढे कायमस्वरूपी निकाली काढण्याचा आमचा प्रामाणिक प्रयत्न आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली असल्याचे नगराध्यक्ष नेहा काकडे यांनी सांगितले. या शिष्टमंडळात नगराध्यक्ष काकडे यांच्यासह स्वच्छता सभापती अक्षय ढोबळे, नगरसेवक आकाश तावडे, राहुल काकडे, मुख्याधिकारी नीता अंधारे, उप मुख्याधिकारी तथा स्वच्छता निरीक्षक अभिजित गोरे आदी उपस्थित होते.

## थोडक्यात

### पानसरे महाविद्यालयात सावित्रीबाई फुले स्मृतिविशेषांकाचे प्रकाशन...

**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.११, अर्जापूर :** येथील पानसरे महाविद्यालयाच्या मराठी विभागाच्या वतीने आद्य शिक्षिका, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त 'नैपुण्य भित्तीपत्रकाचे प्रकाशन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम बी बेलखेडे यांच्या हस्ते करण्यात आले. या भित्तीपत्रकातून महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याचा परिचय करून देण्यात आला आहे. भितीपत्रकाचे संपादन कु.कोमल हनवटे, कु.मनीषा लिमशेट्टे, रितेश तोटरे या विद्यार्थ्यांनी मराठी विभाग प्रमुख डॉ.सिद्धोधन कांबळे, डॉ.नारायण शिवशेट्टे, डॉ.गोपाळ चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली तयार केला आहे.



भित्तिपत्रकाच्या प्रकाशन प्रसंगी महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ.ए.आर. सय्यद, उपप्राचार्य डॉ.गोविंद चौधरी, कार्यालयीन अधीक्षक राजेश्वर लापशेटवार, डॉ. डी.बी जाधव, डॉ.व्ही.के.मदनुरे, डॉआर.सी गोजे, डॉ.एस.एच.मरकले, डॉ.एम.आर वाकरडकर, डॉ.पी.बी.शिंदे, डॉ.एन.जी.भद्रे, डॉ.एम.एस.इंगोले तसेच कार्यालयीन कर्मचारी व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

### नवी मुंबई महापालिका महापे शाळेत महिला दिन उत्साहित साजरा

**अक्षराज : आदिनाथ देशमुख**

**दि.११, नवी मुंबई :** नवी मुंबई महापालिका प्राथमिक शाळा क्रमांक ४० महापे येथे आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने शाळेचे उपक्रमशील मुख्याध्यापक मारुती गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदर उपक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी विभागाच्या नगरसेविका गंगाताई पाटील, माजी नगरसेवक चंद्रकांत पाटील, माजी नगरसेवक नामदेव डावूरकर, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा दुर्गा ठाकूर, सदस्य मेहबूबी शेख आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते. यावेळेस सर्वप्रथम सावित्रीबाई फुले आणि राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून दीप प्रज्वलित करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. यावेळेस राहुल जाधव यांनी अत्यंत खुमासदार पद्धतीने आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे महत्त्व व सद्यस्थितीला जगभरामधील वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये स्त्रियांनी केलेले कार्य याविषयी उत्तम माहिती दिली. या वेळेस नम्रता मोरे, आराध्या तिवारी, आराध्या राऊत, अशफ शेख, दीपक बिंद, श्रेया नावाडकर, तृप्ती मिली आदींनी महनीय अशा स्त्री व्यक्तिमत्त्वाची ओळख उपस्थितांना करून दिली. यावेळी शाळेतील शिक्षक पालक संघ, निपुण माता गट, माता पालक संघ आणि विविध समित्यांची स्त्री सदस्य व महिला पालक आवर्जून उपस्थित होते.



यावेळी महिला दिनाच्या औचित्य साधून उपस्थित मान्यवरांच्या व शाळेतील महिला शिक्षक व महिला कर्मचाऱ्यांचे हस्ते केक कापून आनंद व्यक्त करण्यात आला. त्याच वेळेस उपस्थित सर्व पालक वर्गाला गुलाब पुष्प देवून सर्वांचे स्वागत करण्यात आले. यावेळी मुलांच्या शिक्षणात महत्वाची भूमिका बजावत असलेल्या विशेष माता पालकांचा तसेच निपुण महाराष्ट्र उपक्रमात सहभागी असलेल्या मातांचा सत्कार करण्यात आला. यावेळेस महिला शिक्षिका कर्मचारी व पालकांसाठी संगीत खुर्ची, चमचा लिंबू, फुगा फोडणे यासारखे मनोरंजक खेळाचे आयोजन देखील करण्यात आले होते. यात सर्व महिला पालक शिक्षिका यात हिरीरीने सहभागी झाल्या. विजेत्या महिला पालकांचे शिक्षिका तसेच निपुण माता पालकटातील विशेष कार्य करणाऱ्या माता पालक गटाचा देखील सन्मान यावेळी करण्यात आला. यावेळी नगरसेविका गंगाताई पाटील यांनी विद्यार्थ्यांना आपली आई बहीण यांचा नियमित आदर राखून त्यांचा सन्मान करण्याचा सल्ला दिला. त्यावेळी माजी नगरसेवक चंद्रकांत पाटील आणि नामदेव डाऊरकर यांनी देखील उपस्थित सर्व महिलांना महिला दिनाच्या शुभेच्छा देऊन मुलांनी आपल्या आईचा आदर्श डोळ्यासमोर ठेवावा असे सांगितले. यावेळी समितीच्या अध्यक्षा दुर्गा ठाकूर यांनी शाळेचे मुख्याध्यापक मारुती गवळी यांनी महिला पालकांसाठी आयोजित केलेल्या या खास उपक्रमाचे कौतुक केले.

### आहेरवाडी येथील घराला शॉकसर्किटने आग; लाखांचे नुकसान

**अक्षराज : शिवराज मुगळे**

**दि.११, सोलापूर :** दक्षिण सोलापूर तालुक्यातील आहेरवाडी येथील येथील रहिवाशी इरेश भागण्णा बोरुटे यांच्या घराला शॉक सर्किट होऊन अचानक आग लागली. यात संपूर्ण घर जळून भस्मसात झाले आहे. यात सोने, चांदीसह, रोख रक्कम व संसारोपयोगी साहित्य जळून सुमारे दीड ते दोन लाखांचे नुकसान झाले आहे.




सदर घटनेची पंचनामा गाव कामगार तलाठी वामन जाधव यांनी करुन संबंधित तहसीलदार कार्यालयास अहवाल सादर केला आहे. मंगळवार सकाळी ६ वाजता शॉक सर्किट होऊन अचानक घराला आग लागली.आग एवढे जबरदस्त होते की, घरावरील पत्रे सुद्धा जळून खाक झाली आहे. पण सुदैवाने घरातील सर्व मंडळी बाहेर पडल्याने मनुष्य हानी झाली नाही. सदर घटनेची माहिती मिळताच माजी तंटामुक्त अध्यक्ष नागनाथ बोरूटे, संजू माळी व त्यांचे मित्र मंडळींनी व नागरिकांनी आग विजविण्याचे शर्तीचे प्रयत्न केले परंतु आगीवर नियंत्रण मिळविणे त्यांना शक्य झाले नाही.शेवटी अग्निशामक दलाला पाचारण करून आग विझवण्यात यश मिळविले.

वीज महावितरणच्या अनागोंदी कारभारामुळे या भागात नेहमीच विजेचा दाब कमी-जास्त होत असून त्यामुळेच शॉक सर्किट सारख्या अनेक घटना घडत आहे. अशा घटना होऊन टीव्ही, फ्रिज, कुलर, आदीसह अनेक विद्युत उपकरणे जळून खाक होताना पहावयास मिळत आहे. इरेश बोरुटे यांची आर्थिक परिस्थिती हलाखीची असून संपूर्ण कुटुंब मोल मजुरी करून आपली उपजीविका भागवत आहे. तरी दानशूर व्यक्तीने या कुटुंबाला सढळ हाताने मदत करावी व संबंधित विभागाने बोरुटे कुटुंबीयांना जास्तीत नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते पंचप्पा करजगीकर केली आहे.